**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वामन सोपाना आल्हाट
सावतामाळी नगर, गोदावरी निवास, सोपानमळा,
मु.पो.मोशी, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४४ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वामन सोपाना आल्हाट
सावतामाळी नगर, गोदावरी निवास, सोपानमळा,
मु.पो.मोशी, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे श्री.बाळासाहेब वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
हवेली, जि.पुणे तत्कालीन श्री.प्रभाकर मुसळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन, पुणे याच्या रे.द.नं.२५६/९३ अन्वये कमिशनर म्हणून दि.२६.११.२००२ रोजी नेमणुक झाल्यावर जमिनीच्या मोजणीचा दस्त तथा अहवाल अद्याप प्राप्त झाला नाही. कोर्टास परस्पर सादर केला किंवा कसे, दि.१७.२.२००५ राजी पत्र दिले त्यावरही कार्यवाही नाही. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जमिनीची मोजणी करण्याच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.वामन सोपाना आल्हाट यांनी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, हवेली, जि.पुणे यांच्याकडे मागितली होती. मोजणी अधिकाऱ्यांनी मोजणीचा अहवाल न्यायालयाला सादर केलेला आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.आल्हाट यांनी केले. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, हवेली, जि.पुणे यांनी केलेल्या मोजणीचा अहवाल मार्च २००८ मध्ये न्यायालयाला पाठविण्याचे आपल्याला लेखी कळविले नव्हते, त्यामुळे आपल्याला त्याची कल्पना नव्हती. या अहवालाची प्रत व नकाशा आपल्याला मिळावा, यासाठी समक्ष गेलो असता दि.१८.२.२००८ रोजी आपल्याला ते सांगण्यात आले, त्यामुळे तक्रार राहिलेली नाही, असे लेखी व तोंडी निवेदन श्री.आल्हाट यांनी केले. तयानुसार अहवालाची प्रत व नकाशा श्री.आल्हाट यांना पुरविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विष्णू काका पवार
सी-४, पी. अँड टी. कॉलनी, टिळकनगर,
चेंबुर (प) मुंबई - ८९

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
खानापूर उपविभाग, विटा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४७ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.६.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर जिल्हाधिकारी, सांगली<br>श्री. डी.एस.पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,<br>खानापूर उपविभाग, विटा, जि. सांगली श्री. संजय जाधव | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.४.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>इनाम जमिन गट नंबर ७०८ च्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात जमीन अविभाज्य शर्त कमी करणेसाठी व फेरफार नं. ३६२२ ची नक्कल प्रत मिळणेबाबतची माहिती. | |

<u>**विवेचन**</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २३.६.२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

इनाम जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरील इतर हक्कात जमीन अविभाज्य शर्त कमी करण्यासाठी व फेरफाराची नक्कल मिळण्याची मागणी करणाऱ्या आपल्या पत्रव्यवहारावर झालेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री. विष्णू काका पवार यांनी मागितली होती. आपल्याला अपुरी व विसंगत माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आपल्या अपिलाची योग्य ती दखल घेतली नाही, असे लेखी प्रतिपादन श्री. पवार यांनी केले. जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात नवीन अविभाज्य शर्तीवर रिग्रँट आहे. रिग्रँट उठवण्याबाबत आपण केलेल्या विनंतीवर सहा सहा स्मरणपत्रे देऊनही दखल घेतली नाही, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

कुलकर्णी जमिनीची नवी शर्त कमी करुन त्याची माहिती मिळावी, अशी श्री. पवार यांची मागणी आहे. फेरफाराची प्रत त्यांना दिली असून नवीन शर्तीच्या वतन जमिनीवरील इतर हक्कातील शर्त कमी करण्याबाबतच्या नियमांची माहिती त्यांना देण्यात आली आहे. शर्त कमी करण्याची असल्यास नियमातील तरतुदीप्रमाणे जमा करावयाच्या रकमेबाबतही त्यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच अपिलाच्या सुनावणीतही त्याची माहिती त्यांना देण्यात आली आहे. ही रक्कम भरण्यास ते तयार नसल्यामुळे पुढील कार्यवाही करता आलेली नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी, खानापूर उपविभाग विटा श्री. संजय जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, सांगली श्री. डी.एस. पाटील यांनी केले.

श्री. पवार यांची मागणी 'माहिती' नसून प्रशासकीय कार्यवाहीची आहे. त्याबाबत आवश्यक असलेल्या बाबींच्या पूर्ततेविषयीचीही माहिती त्यांना देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

प्रा.डॉ. वसंत त्र्यंबक झांबरे — अपीलकर्ता
२/३, नरहरी सोसायटी, ९/२, एरंडवणा,
पुणे-४११ ००४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण ) पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर,
ता.शिरूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५७ / पुणे |
| | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** प्रा.डॉ. वसंत त्र्यंबक झांबरे
२/३, नरहरी सोसायटी, ९/२, एरंडवणा, पुणे-४११ ००४

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण ) पुणे विभाग, पुणे तर्फे प्रतिनिधी
श्रीमती स्नेहलता गोपाळराव कसबे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर, ता.शिरूर, जि. पुणे
श्री. नंदकुमार श्रीरंगराव निकम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

प्रा. अपर्णा झांबरे यांच्या भविष्य निर्वाहनिधी, सेवाकालाची, नियुक्तीची तारीख, राजीनामा पत्राची प्रत, तसेच देय रकमांबाबतची अनुषंगिक माहिती, पाचव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम इ.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.१२.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपली कन्या प्रा. अपर्णा झांबरे यांच्या सेवाकालाविषयीची व चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरुर, (घोडनदी ) यांनी देय असलेल्या भविष्य निर्वाह निधी आदी रकमांबाबतची माहिती चुकीची, अपुरी व संक्षिप्त दिली जाते. नियुक्तीची चुकीची तारीख, राजीनामा स्वीकारल्याचे पत्र न देणे यामुळे देय रकमा मिळालेल्या नाहीत. पाचव्या वेतन आयोगाचा फरक आदा करण्यात आलेला नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता डॉ. वसंत त्र्यंबक झांबरे यांनी केले.

प्रा. अपर्णा झांबरे दि. १.१२.१९८६ ते दि. ८.८.१९९७ या कालावधीत महाविद्यालयात सेवेत होत्या. या सेवाकाळातील भविष्य निर्वाह निधी व अन्य देय रकमा आदींबाबतची मुद्देनिहाय सर्व माहिती

डॉ. झांबरे यांना देण्यात आली. आरक्षित जागेवरील नियुक्ती असल्यास विद्यापीठाची मान्यता मिळत नाही, यासह सर्व बाबी डॉ.झांबरे यांना स्पष्ट करण्यात आल्या आहेत. देय रकमांबाबत नियमानुसार आवश्यक ती पूर्तता प्रा. अपर्णा झांबरे यांनी केलेली नाही व त्याबाबत त्यांना त्या त्या वेळी कळविलेले आहे. भविष्य निर्वाह निधीचे देयक तयार करण्यात आले असून मंजुरीनंतर ते अदा करण्यात येईल, उपलब्ध सर्व कागदपत्रे त्यांना दाखविण्याची तयारी आहे, असे जन माहिती

अधिकारी तथा प्राचार्य, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरुर, (घोडनदी ) यांनी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

डॉ.झांबरे यांना दहा मुद्दयांबाबतची सर्व माहिती देण्यात आली आहे. तथापि त्यांच्या काही शंका असल्यामुळे दि.९.७.२००८ रोजी सहसंचालक, ( उच्च शिक्षण ), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे बैठक घेऊन त्याचा अहवाल आयोगाला सादर करण्यात येईल, असे उभय घटकांनी एकमताने दि.२७.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले होते. त्यानुसार दि.९.७.२००८ रोजी सहसंचालक, ( उच्च शिक्षण ), पुणे विभाग, पुणे यांच्या कार्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीस -

१) डॉ. एन.एम.कडू, सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे २) प्रा. श्री. नंदकुमार निकम, प्राचार्य चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर, जि. पुणे, ३) श्रीमती एस.जी. कसबे, प्रशासन अधिकारी, ४) श्री. वसंत त्र्यंबक झांबरे, ५) श्री. एम.व्ही. मुंढे, उच्चश्रेणी लघुलेखक, ६) श्री. पी.जे.बेसरे, कनिष्ठ लिपिक, ७) श्री. कवठेकर, मुख्य लिपिक, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर, जि. पुणे हे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. प्रा. अपर्णा झांबरे यांची नियुक्ती, त्यांना सेवानिवृत्ती वेतन व ग्रॅच्युईटी मिळण्याची डॉ. झांबरे यांची मागणी, पाचव्या वेतन आयोगानुसार फरकाची रक्कम व्याजासह मिळण्याची मागणी आदींबाबत सविस्तर चर्चा झाली, असे नमूद करून सहसंचालक, (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे श्री. एन.एम. कडू यांनी तपशीलवार अहवाल दि.२८.७.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

डॉ. झांबरे यांचा मूळ अर्ज, अनुषंगिक पत्रव्यवहार, लेखी व मौखिक निवेदन, तसेच सहसंचालक, (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांच्याकडील बैठकीत त्यांनी मांडलेले मुद्दे पाहता त्यांची मागणी प्रामुख्याने प्रशासकीय कार्यवाहीची आहे. तथापि प्रा. अपर्णा झांबरे या अमेरिकेत असतात व डॉ. झांबरे यांचे वय ८० वर्षांच्या घरात आहे, हे डॉ.झांबरे यांचे निवेदन लक्षात घेता, जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरुर, (घोडनदी ) श्री. नंदकुमार श्रीरंगराव निकम व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण ) पुणे विभाग, पुणे डॉ. एन. एम. कडू यांनी देय माहिती व अनुषंगिक कार्यवाहीबाबत

आवश्यक त्या बाबींची स्पष्टता डॉ.झांबरे यांना करुन द्यावी. तसेच संबंधित सर्व अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावेत. त्यातील आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती डॉ. झांबरे यांना घेता येतील, असे मौखिक निर्देश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २३.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. दत्तात्रय मोहन पेठकर
आर/०११५२,विष्णू गल्ली, मु.पो.व ता.तासगाव,
जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
पोलीस अधीक्षक,
पोलीस मुख्यालय, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
उपविभागीय पोलीस अधिकारी, मिरज विभाग,
मिरज, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६७ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/११/२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९/१२/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/१२/२००८ |
| ५ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u> :-** अपीलकर्त्याने दि. २०/१०/२००८ रोजी केलेला अर्ज व त्या सोबत जोडण्यात आलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती | |

**विवेचन**

आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने हे अपील निकाली काढण्याबाबत कोणतीही हरकत नसल्याचे अपीलकर्त्याने दि.६/४/२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६-१०-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.केतन दत्तू लाटे
द्वारा-पांडुरंग धोंडिबा ओमासे
मु.पो.बेडग, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, महसूल/आस्थापना शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६८ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.केतन दत्तू लाटे
द्वारा-पांडुरंग धोंडिबा ओमासे
मु.पो.बेडग, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, जि.सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, महसूल/आस्थापना शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्यामुळे दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

दि.१५.५.२००७ रोजी घेतलेल्या लिपिक-टंकलेखक भरतीमध्ये भ,ज,ड प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेली जागा सर्वसाधारण जागांमध्ये समाविष्ट केली, त्याबाबतच्या आधारभूत शासन निर्णयाची प्रत/माहिती जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, महसूल/आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली, जि.सांगली यांनी दिली नाही. त्याऐवजी १९२/-रुपये शुल्क भरून घेऊन 'शासन परिपत्रके' या पुस्तकाची आवश्यक नसलेली छायांकित प्रत दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याविरूध्दचे अपील फेटाळले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.केतन दत्तू लाटे यांनी केले.

विहित प्रक्रियेच्या अनुषंगाने शासन निर्णयाच्या पूर्ण प्रती दिल्या. भ,ज,ड मधील जागा सर्वसाधारणमध्ये समाविष्ट करण्याबाबत विशिष्ट शासन निर्णय नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, महसूल/आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली, जि.सांगली यांचे प्रतिनिधी श्री.पी.बी.माळवे यांनी केले. निवड झालेल्या उमेदवारांची यादी एमकेसीएलने तयार केली. त्यावेळी श्री.लाटे यांनी तक्रार केली नव्हती. तसेच त्यांनी संबंधित परिपत्रकाचा / शासन निर्णयाचा दिनांक अथवा क्रमांक नमूद केलेला नसल्यामुळे आवश्यक माहितीचा बोध होत नाही. तथापि, ज्या जागेसाठी ते दावा करीत आहेत, ती अद्याप रिकामी आहे, असे अपिलीय प्राधिकारी श्री.किशोर तावडे, निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे, त्याची प्रत त्यांचे प्रतिनिधी श्री.विकास खरात यांनी सादर केली.

संबंधित निर्णय कोणत्या नियमांच्या आधारे घेतला याची माहिती अपीलकर्त्यास दिली पाहिजे. त्याबाबतच्या शासन निर्णयाचा दिनांक व क्रमांक अपीलकर्त्याने देणे अपेक्षित करता येणार नाही. त्यांना दिलेल्या अनावश्यक माहितीसाठी घेतलेले शुल्क रू.१९२/- जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, महसूल/आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, जि.सांगली यांनी व्यक्तिशः परत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार पूर्तता अहवाल दि.१५.१२.२००९ पर्यंत आयोगाला जन माहिती अधिकारी यांनी सादर करावा.

पुणे
दि.३०.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवलिंग रामचंद्र बिराजदार
मु.पो.तिकोंडी, ता.जत, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सहसंचालक (प्रशासन, अंदाज व नियोजन),
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे (अ.क्र.८७)
**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद, जि.उस्मानाबाद
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद, जि.उस्मानाबाद (अ.क्र.२७४)
**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद, जि.उस्मानाबाद
(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग, जि.लातूर (अ.क्र.३८४)

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७+२७४+३८४ / सांगली / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवलिंग रामचंद्र बिराजदार
मु.पो.तिकोंडी, ता.जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
लातूर विभाग, जि.लातूर प्रतिनिधी श्री.डी.डी.माडे

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद तत्कालीन श्री.एस.एम.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद, जि.उस्मानाबाद श्री.एस.एम.जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.११.२००६ (अ.क्र.८७)<br>दि.३.१२.२००६ (अ.क्र.२७४)<br>दि.६.१२.२००६ (अ.क्र.३८४) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१२.२०६ (अ.क्र.८७)<br>दि.२८.२.२००७ (अ.क्र.२७४)<br>दि.२२.१२.२००६ (अ.क्र.३८४) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.२.२००७ (अ.क्र.३८४) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.३.२००७ (अ.क्र.२७४)<br>दि.१४.२.२००८ (अ.क्र.३८४) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

आपले सेवानिवृत्ती वेतन व अन्य रकमा प्रलंबित ठेवल्याबाबत अपीलकर्ता श्री.शिवलिंग रामचंद्र बिराजदार यांनी विविध पातळ्यांवर पत्रव्यवहार, अर्ज व अपिले केली असून त्या अनुषंगाने मागितलेली माहिती चुकीची, दिशाभूल करणारी व विलंबाने दिल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

श्री.बिराजदार हे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम,' अपिलीय प्राधिका-यांकडील प्रथम अपिलाची सुनावणी व राज्य माहिती आयोगाकडील सुनावणीला उपस्थित नव्हते.

श्री.बिराजदार दि.३१.१.२००२ रोजी जिल्हा परिषद, प्रशाला, सावरगाव, जि.उस्मानाबाद येथून राजपत्रित मुख्याध्यापक पदावरुन सेवानिवृत्त झाले. त्यापूर्वी त्यांनी सोलापूर, मंगळवेढा, सांगली, पुणे येथे अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये केलेल्या अत्यल्प कालावधीच्या सेवाविषयक

आवश्यक कागदपत्रे त्यांनी सादर केली नाहीत. सेवानिवृत्ती वेतन प्रस्तावाबाबतही आवश्यक ती पूर्तता त्यांनी विहित मुदतीत केली नाही. वेळोवेळी त्यांना कार्यवाहीबाबत कळविण्यात आले तसेच त्यांनी मागितलेली माहितीही देण्यात आली. तथापि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, लोकआयुक्त, मुंबई यांच्याकडे त्यांनी याचिका दाखल केल्या, त्यांचे दावे फेटाळले गेले. माहिती मागणीच्या अर्जात अनेक बाबींचे खुलासे व भाष्य यांची मागणी श्री.बिराजदार करतात उदा.महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) १९८२ च्या क्र.५९ चे नियम आपल्याला मान्य नसावेत याबद्दल आपणांस काय म्हणावयाचे आहे? निवृत्तीवेतन व संबंधित रकमा प्रलंबित ठेवणे, वैयक्तिक प्रकरणात नियम पाळला जातो की नाही? अशा स्वरुपाचे मुद्दे त्यांच्या अर्जामध्ये आहेत. तरीही प्रत्येक वेळी मुद्देनिहाय उत्तर त्यांना देण्यात आले आहे, असे लेखी निवेदन तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर श्री.दि.व.सहस्त्रबुध्दे यांनी आयोगाला सादर केले. तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद श्री.एस.एम.जाधव यांनी पूरक कागदपत्रे सादर केली.

वरील बाबी विचारात घेता श्री.बिराजदार यांना वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. यास्तव आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१ .१०.२००९**